# सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा

किसान भवन, सर्व्हे नं. ५२३ अ/१, प्लॉट नं. ५ व ६,
जिल्हा परिषदेसमोर, सदरबझार, कॅम्प, सातारा – ४१५ ००१
फोन नं. ०२१६२– २२७६३६ ते ४१, फॅक्स नं. ०२१६२ – २२७६४२ व २२७६४५
ई मेल sdccbank@rediffmail.com, वेबसाईट : www.sataradccb.com


---

## ‘कनिष्ठ लेखनिक’ पदासाठी पात्रता / निकष व इतर सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

१) **शैक्षणिक अर्हता व अनुभव** –

अ) कोणत्याही शाखेचा पदवीधर (मान्यताप्राप्त विद्यापीठ)

ब) एमएससीआयटी तत्सम परीक्षा उत्तीर्ण, इंग्रजी–मराठी टंकलेखन. लघुलेखनाची परिक्षा उत्तीर्ण किंवा बँकिंग क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य.

क) दिनांक ३१–१२–२०१६ पूर्वी उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केलेली असावी.

२) **वयोमर्यादा** :

दिनांक ३१–१२–२०१६ रोजी २१ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये.

३) **वेतनमान** :

प्रोबेशन कालावधी संपलेनंतर मा. संचालक मंडळाने मान्य केलेल्या दरानुसार सुरूवातीस साधारण सर्व प्रकारचे भत्ते धरून रु. १३,५००/– पर्यंत तृतीय श्रेणी ‘क’ चे वेतनमान लागू होईल.

४) **इतर** :

१) उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. सातारा जिल्हयातील रहिवाशी असल्यास प्राधान्य दिले जाईल.

२) सांप्रतचे श्रेणीतील या पदाकरिता किमान १ वर्षाचा प्रोबेशन कालावधी ठेवला जाईल. या कालावधीत बँकेच्या नियमानुसार दरमहा एकत्रित पगार दिला जाईल.

३) उमेदवाराकडे अर्जात नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव, वयाचा दाखला व आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्राच्या मूळ व छायांकित प्रमाणित प्रती आवश्यक. सदरच्या प्रमाणपत्रांच्या प्रती नसतील तर उमेदवारास निवडीकरीता अपात्र ठरविले जाईल.

४) पदांची उपलब्ध संख्या विचारांत घेता लेखी परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या किंवा समान गुण धारण करणा–या उमेदवारांमध्ये ते धारण करीत असलेली उच्च / विशेष शैक्षणिक अर्हता, जाहिरातीतील नमूद प्रशिक्षण व अनुभव विचारांत घेता मौखिक परिक्षेसाठी बोलविण्यात येणा–या उमेदवारांची यादी मर्यादित केली जाईल.

५) आलेल्या अर्जाची छाननी करून योग्य व पात्र उमेदवारांना त्यांचे स्वखर्चाने आवश्यकतेनुसार लेखी परीक्षेकरिता आणि मौखिक मुलाखतीकरिता बोलविणेत येईल.

६) यापूर्वी नोकरीसाठी अर्ज केले असतील तर त्याचा विचार केला जाणार नाही. संकेत स्थळावरील विहित नमुन्याप्रमाणेच अर्ज करणे बंधनकारक राहील.

७) उमेदवारांची खालीलप्रमाणे चाचणी घेण्यांत येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | लेखी | ९० गुण |
| ब | मुलाखत | १० गुण |
| | एकूण – | १०० गुण |

टिप : लेखी परीक्षेची पध्दती, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, समाविष्ट विषय, इतर सूचनांबाबत सविस्तरपणे माहिती http://recruit2017.sataradccb.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

८) रिक्त पदांची संख्या कमी–जास्त होणेची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदे वाढल्यास उपलब्ध निवड यादीतून पात्र ठरलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारातून सदरची रिक्त पदे भरण्यात येतील. याबाबतचे सर्व अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

९) उमेदवाराने या कामी कोणाही पदाधिकारी – अधिकारी यांच्याकडून शिफारस आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधितांचे अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१०) निवडीचे अनुषंगाने कोणत्याही उमेदवाराशी स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. कोणत्याही टप्प्यावर निवड प्रक्रिया थांबविणे अथवा रद्द करणेचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

११) उमेदवारांनी संकेत स्थळावर दिलेल्या नमुन्यातील अर्ज भरणे बंधनकारक आहे. या अर्जाव्यतिरीक्त अन्य अर्जाचा, झेरॉक्स अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच उमेदवारांकडून बँकेच्या मुख्य कार्यालयात/ शाखेत पोष्टाने अगर समक्ष आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. ते निवडीसाठी विचारांत घेतले जाणार नाहीत. त्याबाबतची जबाबदारी बँकेची राहणार नाही.

१२) मुदतीनंतर आलेल्या किंवा अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१३) निवड प्रक्रिया सुरू झालेनंतर किंवा निवडीच्या कोणत्याही क्षणी अगर निवड झाल्यानंतर उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती / कागदपत्रे तपासणीनंतर खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार / विनंती विचारांत घेतली जाणार नाही.

१४) जे उमेदवार लेखी परीक्षेमध्ये गुणवत्तेच्या आधारे पात्र होतील त्यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखतीस येताना सर्व दाखल्यांचे मूळ प्रमाणपत्र व प्रमाणपत्राच्या दोन प्रमाणित झेरॉक्स प्रती सोबत आणणे बंधनकारक आहे.

१५) अंतिम निवड झालेल्या उमेदवारास बँकेमध्ये किमान ३ वर्षे सेवा करणेबाबत करारपत्र / हमीपत्र करून द्यावे लागेल.

१६) नैसर्गिक आपत्तीमुळे अगर अन्य कारणामुळे विहित दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर अन्य सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेणेत येईल.

१७) वरील अटींमध्ये अथवा निवड प्रक्रियेच्या निकषामध्ये बँकेच्या मा. संचालक मंडळाने बदल केल्यास अशा बदलानुसार कार्यवाही करण्यात येईल. तो बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.

१८) परीक्षा शुल्क : रु. ५००/-

सदर रक्कम रोखीने भरावी लागेल. सदरची रक्कम ना परतावा राहील.

१९) परीक्षा शुल्क सातारा जिल्हा मध्य. सह. बँकेच्या नजिकचे शाखेत भरणा करणेची आहे.

२०) अर्ज पोहोचण्याची अंतिम मुदत दिनांक ०६-०२-२०१७ पर्यंत राहील.

वरीलप्रमाणे आवश्यक त्या सर्व मूळ कागदपत्रांची खातरजमा (तपासणी) ही पात्र उमेदवारांच्या तोंडी मुलाखती घेणेचे अगोदर केली जाणार आहे. सदर वेळी अर्जात (संकेत स्थळावरील) भरलेली / नमूद केलेली माहिती / तपशिल खोटी असलेचे आढळून आलेस सदर उमेदवार तोंडी मुलाखतीस पात्र असणार नाहीत.